# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

25 JAN 2018

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ केस क्र.१५/ २०१७-१८/ १७ दिनांक : २५-०१-२०१८

**आदेश केस क्र.१५(२०१७-१८)**

| | |
|---|---|
| प्रति,<br>मे.इंडो काऊंट इंडस्ट्रिल लि.,<br>१ MIDC गोकुळ शिरगांव ,<br>ता. करवीर जि.कोल्हापूर | **अर्जदार** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर.<br><br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि.कं.मर्या.<br>ग्रामिण विभाग-२ कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |

**कोरमः-** १.श्री ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे , अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

सदर केसची सुनावणी दिनांक १८.०७.२०१७ आणि दि. ०८.१२.२०१७ दोन दिवशी ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर येथे घेण्यात आली.

तक्रारदाराने दि. ०३.०२.२०१७ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर येथे आपला बिलींग कॅटगरीमध्ये कन्टीन्यअस ते नॉनकंन्टीन्यूस अशा बदलामुळे त्याना देय असलेला फरक व्याजासह मिळावा अशी मागणी केली होती. सदर मागणी अतर्गत तक्रार निवारण कक्ष,कोल्हापूर यांनी त्यांचा आदेश क्र. ३०१३ दिनांक ०३.०४.२०१७ नुसार त्यांची मागणी फेटाळण्यात आल्यामुळे त्यांनी "अ" प्रपत्रामध्ये या मंचाकडे दिनांक १९.०५.२०१७ रोजी अपिल दाखल केले आहे. यामध्ये इंडो काऊंट इडिस्ट्रीज लि. कोल्हापूर ग्राहक क्र. २५१०१९००७८८० यानी Continuous to Noncontinuous या मधील बिलातील फरक रक्कम दिनांक ०१.१०.२०१२ ते ३१.०३.२०१३ या कालावधीतील व्याजासह मिळावी असा अर्ज केला आहे. या संबंधीची प्रथम सुनावणी दिनांक १८.०७.२०१७ रोजी झाली असता आपल्या मागणीच्या पुष्ठयर्थ मा. महाराष्ट्र राज्य विद्युत आयोग केस क्र. ७२/२०१५ आणि म.रा.वि.वि.कं.मर्या यांनी सादर केलेली विविध परिपत्रके जोडली आहेत. दिनांक ०८.१२.२०१७ रोजी आपला युक्तिवाद करताना तक्रारदारने आपण मागणी केलेला टॅरिफ फरकाची दिनांक ०१.१०.२०१२ ते ३१.०३.२०१३ या कालावधीतील रक्कम रु. १२,१५,४७८.०० ही रक्कम आपल्या बिलामध्ये समायोजित करुन जमा मिळाली आहे.असे पत्र सादर केले आहे, आणि या फरकावरील व्याज म.रा.वि.वि.कं.मर्या. कडून मिळावे अशी मागणी केली आहे.

वि.पक्षकारातर्फे आपली बाजू मांडताना श्री सागर मारुळकर, कार्यकारी अभियंता , म.रा.वि.वि.कं.मर्या. कोल्हापूर मंडल कार्यालय, कोल्हापूर यांनी त्यांना त्यांची देय रक्कम देण्यात आलेली आहे. व्याजासंबंधी आम्ही संबंधात वरीष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार केलेला आहे आणि तशी तरतूद असेल तर ग्राहकांस परत देऊ असे सांगितले.

दोन्ही बाजूने केलेले युक्तिवाद सादर केलेली कागदपत्रे याचा विचार करता खालील प्रश्न उपस्थित होतात.

प्रश्न क्र.१: तक्रारदाराची मागणी मान्य करता येईल का?
उत्तर: होय.
प्रश्न क्र.२ अंतिम आदेश?
उत्तर: खाली नमूद केले प्रमाणे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

## कारण मिमांसा

तक्रारदाराने मागणी केलेली रक्कम महावितरणने त्यास बिलामध्ये समायोजित करुन दिलेली आहे. ती योग्य होती हे विविध निकालावरुन स्पष्ट झाले आहे.

महाराष्ट्र विज नियामक आयोगाने केस क्र. ७२/२०१५ मध्ये असे म्हटले आहे की,

२०/१/२०१८

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण



Commission's Analysis and Ruling

The Petitioners applied for a change in the tariff to that applicable for Non-Continuous supply in September-October २०१२ MSEDCL effect the change but only several months later, after approval by its Head Office. The dispute before the EO, Mumbai was regarding the date of applicability of the new tariff category. In his Order dated २ December, २०१४ the EO directed MSEDCL. to

"Change the tariff category of the appellants from Continuous (HT-I-C)to Non-Continuous (HT-I-N) with effect from December २०१२ and refund the differential amount collected from the Appellants by adjusting in their bills within the period of two months from the receipt of this order."

Instead of implementing the EO's Order within the stipulated time. MSEDCL challenged it in WP No.४९६७/२०१५ in the Bombay High Court . The High Court disposed of the matter on ७, September,२०१५ citing the pendency of MSEDCL's Review Petition in Case No.९४ of २०१५ before the Commission, with liberty to approach it afresh thereafter. The Commission has since issued its Order in Case ९४ of २०१५ on१९ August, २०१६

The Commission directs MSEDCL to comply with the E.O. Mumbai's Order within a month including payment of applicable interest for the delay.

कंपनीकडून देय असणारी रक्कम तक्रारदारास मिळाली आहे. तथापि ती उशीरा मिळाली आहे. म्हणून तक्रारदारास व्याज मिळणे हे उचित वाटते. म.वि.नि. आयोग विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी विनियम २००५ कलम १५.६ आगाऊ भरणा मध्ये १५.६.३ प्रमाणे तक्रारदाराने भरणा केलेल्या रक्कमेवर भारतीय रिजर्व बॅकेच्या व्याज दराने वितरण परतावा धारक व्याज देईल असे म्हटले आहे. सदर तक्रारदाराची देय असणारी रक्कम ही आगाऊ भरणा समजून त्यावर प्रचलित बॅक दराने तक्रारदाराने, कॅटगिरी बदला बाबत अर्ज दाखल केलेचे तारखे पासून म्हणजे दिनांक ०४.१०.२०१२ च्या पुढील Billing Cycle म्हणजे दिनांक ०१.११.२०१२ पासून दिनांक ०१.१०.२०१७ पर्यन्त व्याज मिळणेस तक्रारदार प्रात्र आहे. सबब मुळ रक्कम रु. १२,१५,४७८.०० वर द.सा.द.शे. ७% हया प्रचलित बॅक दराने तक्रारदार त्यास मिळणेस पात्र आहे. असा हा मंचाचा निष्कर्ष आहे. सबब आम्ही खालील आदेश पारीत करीत आहोत.

९/०१/२०१८

**अंतिम आदेश**

१) तक्रारदाराची व्याजाची मागणी मंजूर करण्यात येत आहे.

२) विरुध्द पक्षकाराने तक्रारदारांस दिनांक ०१.११.२०१२ ते ०१.१०.२०१७ हया कालावधीतील फरकारची मुळ रक्कम रु. १२,१५,१४७८.०० वर दर साल दर शेकडा) द.सा.द.शे. ७% दराने व्याज द्यावे व ते पुढील विज बिलांत समायोजित करावे व तसा अहवाल हया मंचाकडे पाठवावा.

३) हया आदेशा विरुध्द अपिल दाखल करावयाचे असल्यास या आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कूर्ला-कॉम्प्लेक्स , बांद्रा(पूर्व) मुंबई येथे दाखल करावे

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. बुरांडे) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) 29/1/2018 |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.


सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ केस क्र.१५/ २०१७-१८/ दिनांक : ०७.०२.२०१८

## शुध्दिपत्रक

जावक क्र.:- या कार्यालयाचा आदेश क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र.१५/२०१७-१८/१७ दि.२५.०१.२०१८

प्रति,
मे.इंडो काऊंट इंडस्ट्रिल लि.,
१ MIDC गोकुळ शिरगांव ,
ता. करवीर जि.कोल्हापूर

**अर्जदार**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि.कं.मर्या.
ग्रामिण विभाग-२ कोल्हापूर

**विरुध्द पक्षकार**

या कार्यालयाचा आदेश क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र.१५/२०१७-१८/१७ दिनांक २५.०१.२०१८ च्या आदेशामध्ये रु. १२,१५,४७८.०० ही रक्कम नमूद करण्यात आले आहे. त्याऐवजी **रक्कम रु. . १,२१,५४,४७८.०० असे वाचावे.**

सदरचे शुध्दीपत्रक मा. अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच यांच्या पूर्व परवानगीने काढण्यात येत आहे.

( पी.एस. बुरांडे)
ग्राहक सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

(पी. व्ही. खपली)
सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर